अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थाच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २००४

वाचा : (१) भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ पर्सोनल, पब्लीक ग्रिव्हेन्सेस ॲन्ड पेन्शन्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-३६०३६/८/९८-ईएसटीटी (आरईएस) दिनांक १६ मार्च,१९९९

(२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग विभाग,क्रमांक-सीबीसी १२/२००२/२५२/प्रक्र-१/इमाव-५ दिनांक २५ जानेवारी,२०००

(३) शासन निर्णय,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५ दिनांक ८ डिसेंबर,२००३

आदेश

अनुसूचीत जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना शासन सेवेत, निमशासकीय सेवेत, शासन अंगीकृत संस्थाच्या सेवेत नियुक्ती करण्याआधी त्यांच्या जाती प्रमाणपत्राबाबत वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत अनुक्रमांक ३ येथील शासन निर्णय, सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,क्रमांक-सीबीसी १०/२००३/प्रक्र-९१/मावक-५ दिनांक ८ डिसेंबर,२००३ अन्वये काढलेल्या आदेशास पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

२. मागासवर्गीयांसाठी (अनुसूचीत जमाती वगळून) राखीव असलेल्या जागेवर निवड केलेल्या उमेदवारांच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागांनी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरित सादर करावीत व समितीने आपला निर्णय ३ महिन्यांचे आंत संबंधीत विभागाकडे सादर करावा. थोडक्यात, निवड झालेल्या उमेदवारांनी ३ महिन्याचे आंत वैधता प्रमाणपत्र विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(वि.वा.मेहेर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

(क्रमशः-प.)

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विजाभज) यांचे खाजगी सचिव,
सचिव,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
प्रबंधक,उच्च न्यायालय (अपील शाखा/मूळशाखा), मुंबई
प्रबंधक,मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
सचिव,गृह मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली
सर्व मंत्रालयीन विभाग,

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
संचालक,नगरपालिका प्रशासन,मुंबई
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक,आरोग्य सेवा,मुंबई
आयुक्त, अनुसूचीत जाती/जमाती, भारत सरकार, ५वा मजला, लोकनायक भवन, नवी दिल्ली
उप संचालक,अनुसूचीत जाती/जमाती आयोग,भारत सरकार, चिपळूणकर भवन,शास्त्री मार्ग, नवी पेठ,पुणे-३०
सचिव, कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली,
मुख्य निवडणुक आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, मुंबई
मुंबई महानगर दंडाधिकारी, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई
सर्व जिल्हाधिकारी/ सर्व उप जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल) / सर्व तहसीलदार
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,मुंबई/पुणे/कोल्हापूर/नागपूर/अमरावती/नाशिक/औरंगाबाद
सर्व जिल्हापरिषदांचे शिक्षणाधिकारी/
शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई/ शिक्षणाधिकारी,बृहन्मुंबई महानगरपालिका,मुंबई
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती-मावक-५